डेडीकेटेड फ्रेट कोरीडोर

डेडीकेटेडफ्रेटकोरीडोरकॉर्पोरेशनऑफइन्डियालि
भारतसरकार(रेलमंत्रालय)काउपक्रम
DedicatedFreightCorridorCorporationofIndiaLtd.
A Govt.ofIndia(MinistryofRailway)Enterprise
7thFloor, New Administrative Bldg., D.N. Road, Mumbai-00001
Tel:022-22634185, FaxNo.022-22634184

URGENT -RTI

No.MUM/S/EN/RTI/630

Date: 26.10.2023

To,
Sandeep B Sharma.
International Human Right Suraksha Parishad,
004, New Sainath Nagar, M D Nagar,
Opp Pancharatna Complex, Nalasopar (E),
Tal – Vasai, Dist Palghar, 404 209
Ph No. 7820980651
E mail- ghrpcindia@gmail.com

Sub: Providing of information under RTI Application No 916 dt 10.10.2023.

With reference to subject reply for your RTI application received this Office on 10.10.2023 is as under: -

| SN | Information sought | Information being provided |
|---|---|---|
| 1 | वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कोरिडोर प्रकल्प हेतु महाराष्ट्र राज्य के पालघर जिला/ठाणे जिला में संपादित भूमि से सम्बंधित सभी दस्तावेजों की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं,<br><br>Provide information of all copies of documents to the land acquired in Palghar district / Thane district of Maharashtra state related to the project of Western Dedicated Freight Corridor. | The information sought by the applicant is not specific and vague. Hence cannot be ascertained. |
| 2 | इस प्रकल्प के सभी बाधित स्ट्रक्चर की सूचि तथा मुआवजा प्राप्त / पात्र लाभार्थियों की सूचि उपलब्ध करवाएं<br><br>Provide the list of all the affected structures of this project and the list of compensated/eligible PAPs. | The applicant is not appearing as PAP of DFCCIL project and asked for the information of other PAPs, hence the desired information cannot be given u/s 8(g) & (i) of RTI Act, 2005. |
| 3 | इस मामले में रेलवे/केंद्र सरकार/महाराष्ट्र सरकार द्वारा जारी सभी आदेश, निर्देश, राजपत्र, जी.आर, आदि की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं<br><br>In this matter the copies of all the orders, directives, Gazette notifications, GR etc. may please be provided. | Copy of GoM GR dated 22/05/2018 is enclosed herewith. |
| 4 | इस सम्बन्ध में किस तारीख को सर्वे किया गया तथा किस क्षेत्र में अंतिम सूचि कब जारी की गई इसकी जानकारी से सम्बंधित सभी दस्तावेजों की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं | The information sought by the applicant is related to DRO/Palghar office. Hence the said application may |



Kaul 27/10

डेडीकेटेड फ्रेट कोरीडोर

डेडीकेटेडफ्रेटकोरीडोरकॉर्पोरेशनऑफइन्डियालि

भारतसरकार(रेलमंत्रालय)काउपक्रम

DedicatedFreightCorridorCorporationofIndiaLtd.

A Govt.ofIndia(MinistryofRailway)Enterprise

7thFloor, New Administrative Bldg., D.N. Road, Mumbai-00001

Tel:022-22634185, FaxNo.022-22634184

| | | |
|---|---|---|
| | In this connection the information about when the survey was done and the information regarding the area where the final list was declared with photocopies of all relevant documents. | please be forwarded to DRO/Palghar office. |
| 5 | रेलवे अमेंडमेंट एक्ट २००८ अनुसार वसई तालुका में वे वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कोरिडोर हेतु संयुक्त मोजणी रजिस्टर, मोजणी नकाशा, व मोजणी पत्रक से सम्बंधित दस्तावेजों की छायांकित प्रतियां मिलने हेतु निवेदन.<br><br>Request a copy of Joint Measurement Register, Joint Measurement Map, and Joint Measurement report of Western Dedicated Freight Corridor Freight Corridor in Vasai taluka as per Railway Amendment Act 2008. | The information sought Joint Measurement register is not available. Further Joint Measurement Map & report is enclosed.<br>It may be noted that the Joint Measurement Map of DFCCIL in vasai Taluka shall cost Rs.11,310/- and Joint Measurement Report of Vasai Taluka shall cost of Rs.80/- (calculation sheet enclosed). |
| 6 | इस सम्बन्ध में उपलब्ध सभी दस्तावेजो, कार्यालयीन आदेश / नोटिस की छायांकित प्रतिया उपलब्ध करवाए.<br><br>In this connection provide photocopies of all documents, official orders/notice. | The information sought by the applicant is not specific and vague. Hence cannot be ascertained. |

If the petitioner desires to file an appeal on this, he must do so within 30days of receipt of this reply. The appeal should be addressed to the Appellate Authority given below: -

Ms. Renu Pushkar Chhibber, CGM/Admin,
Dedicated Freight Corridor Corporation of India Ltd,
Room No -509, 5th Floor, Supreme Court Metro Station Building Complex,
Pragati Maidan, New Delhi – 110001,
Phone No - +91-11-23454710

(Ravi Kumar Bhargava) 23/10
Dy CPM/Finance (APIO)
DFCCIL –Mumbai/South

C/- 1. Shri S K Panda,
2. DRO/Palghar for providing information related to Sr No 4.

SR No. 3

**महाराष्ट्र राज्यामध्ये डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पाकरिता भूसंपादनामुळे बाधित पात्र बांधकामधारकांच्या पुनर्वसन व पुन:स्थापने बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१८/प्र.क्र.११९/र-३**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २२ मे, २०१८

वाचा :-१. डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. भारत सरकार (रेल मंत्रालय) उपक्रम यांचे पत्र क्र. MUM(S)/EN/BR/R&R/४७३, दिनांक २४/०२/२०१८

२. उप आयुक्त (पुनर्वसन) कोंकण विभाग यांचे पत्र क्रमांक पुनर्वसन/ कार्या-१/DFCC/२०१८, दिनांक २२/०२/२०१८. व दि.१८/०५/२०१८

**प्रस्तावना :**

डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. हा विशेष प्रकल्प रेल्वे मंत्रालयाने देशामध्ये मालभाडेपट्टा बांधणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे यासाठी गठीत केला आहे, ज्यामध्ये वेस्टर्न डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर रेल्वे मार्ग मुंबई जवळील जवाहरलाल नेहरू बंदर येथून सुरु होऊन पुढे उत्तरेकडे दिल्ली पर्यंत जातो. हा मालभाडेपट्टा मुंबईमधील बंदरांना जोडतो, जो भविष्यात होणाऱ्या दिल्ली - मुंबई औद्योगिक पट्ट्यासाठी महत्त्वाचा ठरेल आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक आणि दळणवळण क्षेत्रांचा विकास मोठ्या प्रमाणात होईल.

२. महाराष्ट्र राज्यामध्ये मालभाडेपट्ट्याची लांबी १८० किलोमीटर इतकी आहे. ज्यामध्ये १०२ गावांमधील २५० हेक्टर खाजगी तर १७८ हेक्टर शासकीय जमीन रायगड, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यातून संपादित केली जात आहे. डीएफसी प्रकल्पाचे हे भूसंपादन रेल्वे सुधारित कायदा-२००८ **(Railway Amendment Act, 2008)** या विशेष कायद्यांतर्गत केले जात आहे. याच दरम्यान **"The Right to Fair Compensation & Transparency in Land Acquisition Rehabilitation & Resettlement Act - २०१३"** हा नवीन केंद्रीय अधिनियम अस्तित्वात आला आहे. या पार्श्वभूमीवर डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पास चालना देण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या पात्र बांधकामधारकांच्या पुनर्वसनासंबंधी डीएफसीआयएल ने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाचा परामर्श घेवून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पासाठी स्थलांतरीत कराव्या लागणाऱ्या पात्र बांधकामधारकांच्या पुनर्वसन विषयक लाभासंदर्भात शासन पुढीलप्रमाणे धोरणास मान्यता देत आहे.

**परिच्छेद-१ : बांधकाम निवाडा / अधिकृत सर्वेक्षण व्दारे खाजगी जमीनीवरील पात्र ठरलेले बांधकामधारक.**

ज्या प्रकरणी भूसंपादन अधिनियम, रेल्वे सुधारीत कायदा-२००८ या विशेष कायद्याच्या अंतर्गत संबंधित सक्षम प्राधिकारी व्दारा जाहिर केलेल्या निवाड्यात समाविष्ट बांधकाम व त्याअनुषंगाने कार्यप्रणाली मध्ये निर्देशित निकषाप्रमाणे प्रभावित पात्र बांधकामधारकास केंद्र शासनाच्या **"The Right to Fair Compensation & Transparency in Land Acquisition Rehabilitation & Resettlement Act - २०१३"** कलम १०८ चे उप-कलम (१) आणि (२) अन्वये व रेल्वे बोर्डाचे एन्टायटेलमेंट मॅट्रीक्सच्या शेड्युल-२ च्या क्र. १ कॉलम-३ (प्रपत्र-अ) मध्ये निर्देशीत व्यक्तींना पुनर्वसन संदर्भात खालीलप्रमाणे लाभ देय राहील.

१. **वैकल्पिक घर किंवा रोख रक्कम** : स्वत: रहात असलेल्या घराऐवजी वैकल्पिक घर किंवा त्याबदल्यात शासनाने ठरविलेल्या रोख स्वरूपात रक्कम, संबंधीत घरमालकास देय राहील.

२. **एक रकमी निर्वाह भत्ता** : स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक प्रकल्पबाधित कुटूंबास एक रकमी रू. ३६,०००/- निर्वाह भत्ता देय राही.

३. **वाहतुकीसाठी आर्थिक सहाय्य** : स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक प्रकल्पबाधित कुटूंबास रू. ५०,०००/- इतकी रक्कम सामान वाहतुकीसाठी देय राही.

४. **जुन्या बांधकामांची सामुग्री नेण्यास अनुमती**: जुन्या बांधकामांची सामुग्री विनामुल्य, स्वखर्चाने नेण्यास संबंधित प्रकल्पबाधित बांधकामधारकास अनुमती राहील.

५. **नोंदणी व मुद्रांक शुल्क परतावा** :

प्रकल्पबाधितांना मोबदला मिळाल्यानंतर एक वर्षाच्या आत स्वत: किंवा पत्नीच्या नावे वैकल्पिक घराच्या खरेदीवर शसनास देय नोंदणी व मुद्रांक शुल्क भरल्याची पावती प्रस्तूत केल्यास, त्या रक्कमेचा संबंधीतास परतावा संपादन संस्थेकडून देय होईल.

दिनांक ०१.०१.२०१५ नंतर घोषित निवाड्यातील ज्या बाधितांनी किंवा त्यांच्या कुटूंबातील सदस्यानी वरिल धोरणाप्रमाणे किंवा RFCTLARR - २०१३ तरतुदीचा लाभ मिळावा असा पर्याय दिला असेल, तिथे त्या पर्याया प्रमाणे पुनर्वसनाचा लाभ देण्याची तरतुद राहील.

ज्या प्रभावित बांधकामधारकांनी दिनांक ०१.०१.२०१५ च्या आधी संबंधीत सक्षम प्राधिकारी व्दारा जाहीर निवाड्याव्दारे बांधकाम मोबदला संदर्भात NRRP - २००७ मधील तरतूदी प्रमाणे पुनर्वसन व पुनर्स्थापना विषयक लाभ स्विकारले असतील, अशा बांधकामधारकांना वर उल्लेखित परिच्छेद-१ प्रमाणे पुनर्वसन व पुन:स्थापनेचा लाभ हवा असल्यास त्यांनी तसा स्विकारलेला रोख लाभ परत जमा करावा किंवा त्या रकमेची वसुली वैकल्पीक घराच्या वाटपा आधी करण्यात येईल.

ज्या जमीनीचा निवाडा जाहीर करण्यात आला अशा जमीनीवर निवाडा जाहीर झाल्याच्या पश्चात बांधकाम आढळल्यास त्या बांधकामधारकास या शासन निर्णया प्रमाणे कोणताही लाभ देय होणार नाही.

**परिच्छेद - २ सार्वजनिक जमीनीवर वसलेले व परिच्छेद-१ मध्ये समाविष्ट नसलेले बांधकामधारक.**

ज्या प्रकरणी रेल्वे एन्टायटेलमेंट मॅट्रिक्स -२०१५ च्या टिपणी अनुसार निर्धारीत तारखेच्या संदर्भाने भुसंपादन अधिनियम रेल्वे सुधारित कायदा-२००८ च्या अन्वये भारताच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यासाठीची प्रथम २०A अधिसुचनेच्या दिनांकाआधी पासून सार्वजनिक जमिनीवर वसलेल्या प्रभावित पात्र बांधकामधारकास रेल्वे एन्टायटेलमेंट मॅट्रिक्स - २०१५ च्या शेड्युल-२ च्या क्र. १ कॉलम-५ मधील परिच्छेद-सी © (प्रपत्र-अ) च्या तरतुदीनुसार पुनर्वसन संदर्भात खालीलप्रमाणे लाभ देय राहील.

१. **वैकल्पिक घर किंवा रोख रक्कम** : स्वत: रहात असलेल्या घराऐवजी वैकल्पिक घर किंवा त्याबदल्यात शासनाने ठरविलेल्या रोख स्वरुपात रक्कम, संबंधीत घरमालकास देय राहील.

२. **एक रकमी निर्वाह भत्ता:** स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक प्रकल्पबाधित कुटूंबास एक रकमी रू. ३६,०००/- निर्वाह भत्ता देय राहील.

३. **वाहतूकीसाठी आर्थिक सहाय्य** : स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक प्रकल्पबाधित कुटूंबास रू. ५०,०००/- इतकी रक्कम सामान वाहतुकीसाठी देय राहील.

४. **जुन्या बांधकामांची सामुग्री नेण्यास अनुमती :** जुन्या बांधकामांची सामुग्री विनामुल्य स्वखर्चाने नेण्यास संबंधित प्रकल्पबाधित बांधकामधारकास अनुमती राहील.

सदर प्रकल्पासाठी संपादित होणाऱ्या जमिनीवर वर उल्लेखित परिच्छेद १ व २ मधील संबंधित बांधकामधारकाचे एकाहून जास्त बांधकामे असल्यास, ज्या बांधकामामध्ये तो राहतो त्या बांधकामाबद्दल पुनर्वसन व पुन:स्थापनेचा लाभ या शासन निर्णया प्रमाणे देण्यात येईल. त्याच्या इतर बांधकामासाठी त्याला कोणतेही लाभ देय होणार नाही.

**परिच्छेद -३ : सार्वजनिक सुविधांचे (Commen Property Resources) पुन:स्थापन.**

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीवरील बाधीत होणाऱ्या सार्वजनिक सुविधा जसे मंदिर, प्रार्थना स्थळ, स्मशान भूमि, विहिर, बोरींग इत्यादी योग्य रितीने पुन:स्थापित करणे हा ह्या पुनर्वसन कार्याचा भाग राहिल.

<u>कार्यप्रणाली :</u>

वर उल्लेखिलेल्या परिच्छेद क्र. १, २ व ३ अन्वये डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पामुळे स्थलांतरीत होणाऱ्या सर्व पात्र बांधकाम धारकांचे पुनर्वसन व पुन:स्थापना व प्रभावित सार्वजनिक सुविधाचे पुन:स्थापन बाबतची कार्यप्रणाली खालील प्रमाणे विहीत करण्या येत आहे.

१. डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पामुळे बाधित बांधकामधारकांच्या जिल्हानिहाय सर्वकष पुनर्वसन व पुन:स्थापना अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग हे संबंधीत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना नामनिर्देशित करतील.

२. <u>परिच्छेद - १ प्रमाणे पात्र बांधकामधारकांच्या पुनर्वसन व पुन:स्थापनेचे कार्यन्वयन:</u> डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पासाठी जमिन संपादनामुळे बाधित बांधकाम निवाड्याच्या प्रती संबंधीत सक्षम अधिकारी यांनी नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे पुनर्वसन व पुन:स्थापनेची पुढील कार्यवाही करण्यासाठी पाठवाव्यात.

नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी निवाड्यात समाविष्ट असलेल्या सर्व बांधकामांची आणि त्यामधील गाळ्यांची (जर असल्यास) सुची संयुक्त मोजणी नकाशा/विवरणपत्र/ सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मुल्यांकन इत्यादि आधारे तयार करतील.

तदनंतर वरील बांधकाम/गाळ्यांच्या सुचीच्या आधारे विस्थापीत होणाऱ्या बांधकामधारकांची नावाची सुची तयार करतील व त्या करीता वरील परिच्छेद क्र. १ अन्वये बांधकाम निवाड्यातील बांकामधारक, ज्याचा मालकी हक्क सदर निवाड्यात नमूद आहे, किंवा नसल्यास १) उप अधिक्षक भूमी अभिलेख अथवा २) सार्वजमिनक बांधकाम विभाग अथवा ३) डीएफसी व्दारा नियुक्त एनजीओ च्या सर्वेक्षण अहवाल आधारे हक्क संबंधीची पात्रता आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून निश्चित करतील.

अशा प्रकारे निश्चित पात्र बांधकामधरकास, देय होणाऱ्या व राज्य शासनातर्फे डीएफसीसीआयएलला उपलब्ध करून दिलेल्या निवसी घर / सदनिका वितरीत करण्याची कार्यवाही संबंधीत नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी खालील प्रमाणे करावी.

अ) संबंधीत बांधकाम / धारकास देय होणाऱ्या घराची पात्रता व देय लाभ बांधकाम धारकास कळवून ती जाहीर नोटीशीव्दारे स्थानिक वर्तमानपत्रात तसेच संबंधीत गावात प्रसिध्द करावी.

आ) सदर नोटीशीच्या अनुषंगाने एक महीन्याच्या आत प्राप्त होणाऱ्या बांधकामाचा मालकी हक्क, हिस्सा वगैरे बाबतीत वाद असलेल्या तक्रार प्रकरणी, नामनिर्देशित जिल्हा

पुनर्वसन अधिकारी यांनी आवश्यक ती शहनिशा करून पुढील दोन महिन्याच्या आत उचित निर्णय घेऊन आदेश पारित करावा.

इ) ज्या बांधकाम / गाळ्यांच्या हक्का संबंधी तक्रार नसल्यास अशा बांधकामधारकांची सुची तयार करून त्यांनी संबंधीत पात्र बांधकामधारकास देय घर / सदनिका व इतर लाभाच्या अंतिम यादीस विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांची मान्यता मिळवून संबंधीत बांधकामधारकास पुन:स्थापनेसाठी आरेखीत केलेल्या ठिकाणी वाटप करावयाच्या घर / सदनिकांची सार्वजनिक सोडत विहित / प्रचलीत पध्दतीप्रमाणे तक्रार नोटीसीची मुदत संपल्यावर एक महिन्याच्या आत करावी. त्यानंतर प्रकल्पबाधीत बांधकामधारकांचया पुन:स्थापनेसाठी वाटप करावयाच्या घर / सदनिका व इतर देय लाभांबद्दल देयकपत्रक तयार करून त्याबाबतचा आदेश पारीत करावा.

आदेश पारीत झाल्यानंतर बांधकामधारकांना आदेश अमान्य असल्यास त्यांनी पुढील एक महीन्याच्या आत आपला आक्षेप आवश्यक त्या कागदपत्रासह उप आयुक्त (पुनर्वसन) कोकण विभाग सीबीडी बेलापूर यांच्याकडे लेखी स्वरूपात कळवावा. संबधित आक्षेपकर्त्याला उप आयुक्त (पुनर्वसन) यावर व्यक्तिगत रूपाने सुनावनीची संधी प्रदान करतील तथा चौकशी केल्यानंतर योग्य विचार करता आदेशाव्दारे आक्षेप मान्य किंवा अमान्य करतील उप आयुक्त (पुनर्वसन) यांचा निर्णय अंतिम राहिल.

नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिका-यांनी कळविल्याप्रमाणे, संबंधीत बांधकामधारकास देय होणा-या इतर लाभांच्या एकूण रकमा डीएफसीसीआयएलने उपलब्ध करून देऊन नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी संबंधितांना अदा कराव्यात. तसेच संबधीत बांधकामधारकाकडून ते आपले प्रभावित बांधकाम, जुन्या सामग्रीचे, त्यांना हव्या असल्यास, विहित मुदतीत पुन:स्थापनेच्या ठिकाणी स्थलांतरीत करून जागा मोकळी करून देतील असे हमी पत्र घेऊन घर / सदनिका वाटपपत्र द्यावे व त्यांस देय होणा-या इतर लाभांच्या रकमा अदा कराव्यात. तसेच मोकळे झालेले बांधकाम डीएफसीसीआयएल यांनी संबंधीत सक्षम प्राधिकारी यांच्या मदतीने निष्कासीत करावे.

नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी हयांना काही कारणास्तव कोणत्याही आदेशामध्ये अनावधानाने झालेल्या त्रुटी आढळल्यास आदेश पारित झाल्याच्या दोन महीन्याच्या कालावधीत त्याबाबतचा दुरुस्ती आदेश पारित करण्याची मुभा राहील.

१. **परिच्छेद-२ प्रमाणे पात्र बांधकामधारकांच्या पुनर्वसन व पुन:स्थापनेचे कार्यान्वयन:**

डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पासाठी लागणा-या सरकारी जमिनीवरील स्थलांतरीत होणा-या अनाधिकृत बांधकामधारकांच्या बाबतीत वरील परिच्छेद क्र.२ अन्वये पुनर्वसन व पुन:स्थापनेसाठी नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यंनी खाली नमुद केल्यानुसार कार्यवाही करावी.

अ) डीएफसीसीआयएल यांनी संपादनाखालील येणा-या जमिनीवरील अनधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण करून धारकांची यादी नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना उपलब्ध करून द्यावी. त्याआधारे वर उल्लेखिलेल्या परिच्छेद क्र.२ अन्वये संबधीत बांधकाम धारकास देय होणा-या घराची पात्रता व देय लाभ नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निश्चित करून सदर माहिती बांधकाम धारकास कळवून ती जाहीर नोटीशीव्दारे स्थानिक वर्तमानपत्रात तसेच संबंधीत गावात प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करावी.

आ) सदर नोटीशीच्या अनुषंगाने एक महिन्याच्या आत प्राप्त होणाऱ्या बांधकामाचा मालकी हक्क, हिस्सा वगैरे बाबतीत वाद असलेल्या तक्रार प्रकरणी, नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी आवश्यक ती शहनिशा करून पुढील दोन महिन्याच्या आत उचित निर्णय घेऊन आदेश पारित करावा.

इ) ज्या बांधकाम / गाळ्यांच्या हक्का संबंधी तक्रार नसल्यास अशा बांधकामधारकांची सुची तयार करून त्यांनी संबंधीत पात्र बांधकामधारकास देय घर / सदनिका व इतर लाभाच्या अंतिम यादीस विभागीय आयुक्त कोकण विभाग यांची मान्यता मिळवून संबंधीत बांधकामधारकास पुन:स्थानेसाठी आरेखीत केलेल्या ठिकाणी वाटप करावयाच्या घर / सदनिकांची सार्वजनिक सोडत विहित/ प्रचलीत पध्दतीप्रमाणे तक्रार नोटीसीची मुदत संपल्यावर एक महिन्याच्या आत करावी. त्यानंतर प्रकल्पबाधीत बांधकाम धारकांच्या पुन:स्थापनेसाठी वाटप करावयाच्या घर / सदनिका व इतर देय लाभांबद्दल देयकपत्र तयार करून त्याबाबतचा आदेश पारीत करावा.

आदेश पारित झाल्यानंतर ज्या बांधकामधारकांना आदेश अमान्य असल्यास त्यांनी पुढील एक महीन्याच्या आत आपला आक्षेप आवश्यक त्या कागदपत्रासह उप आयुक्त (पुनर्वसन) कोकण विभाग सीबीडी बेलापूर यांच्याकडे लेखी स्वरूपात कळवावा. संबंधीत आक्षेपकर्त्याला उप आयुक्त (पुनर्वसन) यावर व्यक्तिगत रूपाने सुनावणीची संधी प्रदान करतील तथा चौकशी केल्यानंतर योग्य विचार करता आदेशाव्दारे आक्षेप मान्य किंवा अमान्य करतील, उप आयुक्त (पुनर्वसन) यांचा निर्णय अंतिम राहिल.

नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी कळविल्याप्रमाणे, संबंधीत बांधकामधारकास देय होणाऱ्या इतर लाभांच्या एकूण रकमा डीएफसीसीआयएलने उपलब्ध करून देऊन नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी संबंधितांना अदा कराव्यात. तसेच

संबंधीत बांधकामधारकाकडून ते आपले प्रभावित बांधकाम, जुन्या सामग्रीचे, त्यांना हव्या असल्यास, विहित मुदतीत पुन:स्थापनेच्या ठिकाणी स्थलांतरीत करून जागा मोकळी करून देतील असे हमीपत्र घेऊन घर/ सदनिका वाटपपत्र द्यावे व त्यांस देय होणाऱ्या इतर लाभांच्या रकमा अदा कराव्यात. तसेच मोकळे झालेले बांधकाम डीएफसीसीआयएल यांनी संबंधीत सक्षम प्राधिकारी यांच्या मदतीने निष्कासीत करावे.

नामनिर्देशित जिल्हा पुनर्वसन अधिकारी ह्यांना काही कारणास्तव कोणत्याही आदेशामध्ये अनावधानाने झालेल्या त्रुटी आढळल्यास आदेश पारित झाल्याच्या पुढील दोन महीन्याच्या कालावधीत त्याबाबतचा दुरूस्ती आदेश पारित करण्याची मुभा राहील.

४ <u>परिच्छेद - ३ : सार्वजनिक सुविधांच्या</u> <u>(Common Property Resources)</u> <u>पुन:स्थापनेचे कार्यान्वयन :</u> सदर प्रकल्पासाठी बाधीत होणाऱ्या आवश्यक त्या सर्व सार्वजनिक सुविधा च्या ऐवजी योग्य त्या वैकल्पीक सुविधा निर्माण करून देण्याची जबाबदारी डीएफसीसीआयएल ची राहील. अशा कामाचे डीएफसीसीआयएल ने सर्वेक्षण करून व बाधित सार्वजनिक सुविधा मालकांशी चर्चा करून प्रस्ताव तयार करून नामनिर्देशित पुनर्वसन प्रशासक यांना सादर करावा. पुनर्वसन प्रशासक यांना प्रस्ताव सादर केल्यानंतर पुनर्वसन प्रशासक संबंधीत सार्वजनिक सुविधा मालक व डीएफसीसी यांच्याशी प्रस्तावावर चर्चा करतील व तदनंतर अशा सोयीसुविधांच्या बाबतीत आदेश पारित करतील तसेच अशा सुविधांच्या पुन:स्थापनेसाठी आवश्यक जमिनीची तरतूद, गरज असल्यास, राज्य शासनाव्दारे केली जाईल. याचा मोबदला खर्च डीएफसीसीआयएल वहन करेल.

५. वरील प्रमाणे उल्लेखित डीएफसीसीआयएल प्रकल्पाकरीता पुनर्वसन व पुन:स्थापना कार्यप्रणालीच्या अंमलबजावणीचे समन्वय संबंधित जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, कोकण विभाग करतील. त्यासाठी आवश्यक कर्मचारी व सोयी सुविधा जसे संगणक, वाहन, स्टेशनरी, इंधन, प्रशासकीय खर्च इत्यादी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी डीएफसीसीआयएल संस्थेची राहील.

**६. सदर शासन निर्णयात नमूद लाभांव्यतिरिक्त अधिक लाभ "भूमिसंपादन, पुनर्वसन व पनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदशेकतेचा हक्क अधिनियम" २०१३ नुसार अनुज्ञेय असल्यास पात्रतेनुसार प्रकल्पबाधितांना संपादन संस्थेकडून देय राहतील.**

७. डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर प्रकल्पामुळे स्थलांतरीत कराव्या लागणाऱ्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व पुन:स्थापनेच्या सर्वकष कार्यवाहीचे सनियंत्रण विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांच्या माध्यमातून प्रशासकीय विभाग म्हणून मंत्रालयाच्या महसूल व वन विभागाचे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५२२१६५६२८५३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rahul Vijay Kulkarni

Digitally signed by Rahul Vijay Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, cn=Rahul Vijay Kulkarni
Date: 2018.05.22 16:54:26 +05'30'

**( राहुल कुलकर्णी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, (नियोजन), मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक, डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., नवि दिल्ली.
१३) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
१४) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) जिल्हाधिकारी रायगड, ठाणे, पालघर

~~Rate~~ Sr No. 5.

**Joint Measurement Map**

| SN | Village | Paper size | Rate | No.of Drawings | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Nagle | A0 | 390 | 3 | 1170 |
| 2 | Shilottar | A0 | 390 | 1 | 390 |
| 3 | Sasunavghar | A0 | 390 | 1 | 390 |
| 4 | Sarjamaori | A0 | 390 | 1 | 390 |
| 5 | Mori | A0 | 390 | 1 | 390 |
| 6 | Chandrapada | A0 | 390 | 4 | 1560 |
| 7 | Juchandra | A0 | 390 | 1 | 390 |
| 8 | Tivri | A0 | 390 | 1 | 390 |
| 9 | Rajavali | A0 | 390 | 1 | 390 |
| 10 | Gokhivare | A0 | 390 | 4 | 1560 |
| 11 | Bilalpada | A0 | 390 | 2 | 780 |
| 12 | Dhaniv | A0 | 390 | 2 | 780 |
| 13 | Bhatpada | A0 | 390 | 1 | 390 |
| 14 | Shirgaon | A0 | 390 | 3 | 1170 |
| 15 | Kasarali | A0 | 390 | 3 | 1170 |
| **Total** | | | | **29** | **11310** |

Joint Measurement Report

| SN | Village | Paper size | Rate | No.of xerox | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Nagle | A4 | 2 | 2 | 4 |
| 2 | Shilottar | A4 | 2 | 1 | 2 |
| 3 | Sasunavghar | A4 | 2 | 1 | 2 |
| 4 | Sarjamaori | A4 | 2 | 1 | 2 |
| 5 | Mori | A4 | 2 | 2 | 4 |
| 6 | Chandrapada | A4 | 2 | 2 | 4 |
| 7 | Juchandra | A4 | 2 | 1 | 2 |
| 8 | Tivri | A4 | 2 | 5 | 10 |
| 9 | Rajavali | A4 | 2 | 4 | 8 |
| 10 | Gokhivare | A4 | 2 | 4 | 8 |
| 11 | Bilalpada | A4 | 2 | 3 | 6 |
| 12 | Dhaniv | A4 | 2 | 2 | 4 |
| 13 | Bhatpada | A4 | 2 | 1 | 2 |
| 14 | Shirgaon | A4 | 2 | 9 | 18 |
| 15 | Kasarali | A4 | 2 | 2 | 4 |
| **Total** | | | | **40** | **80** |

DPM/SDT
23/10/2023